प्रभात
पुणे, शुक्रवार, दि.१६ जुलै २०२१

# शिक्षण पद्धतीत भौतिकतेचा पगडा







प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १५** - मातृभाषेतील शिक्षण हळूहळू बंद होत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये संत साहित्याची ओळखच नाही. आजच्या शिक्षण पद्धतीत भौतिकतेचा पगडा अधिक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये तणाव वाढून नैराश्य आले आहे. अशावेळेस मूल्याधिष्ठित जीवन जगण्याची कला शिकवायची असेल तर संत साहित्यांचा खजिना त्यांना द्यावा, असे विचार हिमाचल प्रदेशचे माजी राज्यपाल विष्णू कोकजे यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समितीतर्फे आयोजित पहिल्या चारदिवसीय 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदे'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. संस्थेचे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड हे अध्यक्षस्थानी होते. ह.भ.प. किसन महाराज साखरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष राहुल कराड, कुलगुरू डॉ. एन. टी. राव, ह.भ.प. बापूसाहेब मोरे, ह.भ.प. डॉ. रविदास महाराज शिरसाठ, समन्वयक डॉ. संजय उपाध्ये आणि डॉ. मिलिंद पांडे हे उपस्थित होते.

डॉ. विश्वनाथ कराड म्हणाले, आजची पिढी पाश्चात्य संस्कृतीमुळे वेगळ्या मार्गावर चाललेली आहे. त्यामुळे त्यांचे स्वत्व, स्वाभिमान आणि स्वधर्म गळून पडला आहे. त्याला जागृत करण्याचे कार्य संत साहित्यातून होईल. विज्ञान आणि अध्यात्माच्या समन्वयातून समाजात सुख, समाधान आणि शांती नांदेल. तरुणांमध्ये भारतीय संस्कृती, तत्वज्ञान आणि परंपरेचा संदेश रुजविल्यास संस्कारक्षम पिढी निर्माण होईल. तसेच, संत साहित्याचा उच्च शिक्षणामध्ये अंतर्भाव झाल्यास समाजोन्नती होईल. त्याग, समर्पण, मानवता आणि संतांचे तत्त्वज्ञान विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे ही काळाची गरज आहे.

पुढारी
पुणे, शुक्रवार, दि.१६ जुलै २०२१

# संत साहित्य जीवन जगण्याची कला शिकविते

## माजी राज्यपाल न्या. कोकजे यांचे विचार

शिक्षण हळूहळू बंद होत असल्याने विद्यार्थ्यांना संत साहित्याची ओळखच नाही. आजच्या शिक्षण पद्धतीत भौतिकतेचा पगडा अधिक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये तणाव वाढून नैराश्य आले आहे. अशा वेळेस मूल्याधिष्ठित जीवन जगण्याची कला शिकवायची असेल, तर संत साहित्याचा खजिना त्यांना द्यावा, असे विचार न्या. विष्णू कोकजे यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, आळंदी-देहू परिसर विकास समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या चार दिवसीय भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदेचे ऑनलाइन उद्घाटन करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. डॉ. विश्वनाथ कराड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. तर ह.भ.प. किसन महाराज साखरे यांच्यासह राहुल कराड, कुलगुरू डॉ. एन. टी. राव, परिषदेच्या संयोजन समितीचे अध्यक्ष ह.भ.प. बापूसाहेब मोरे, कार्याध्यक्ष ह.भ.प. डॉ. रविदास महाराज शिरसाठ, समन्वयक डॉ. संजय उपाध्ये हे उपस्थित होते.

न्या. विष्णू कोकजे म्हणाले, ''उच्च शिक्षणावर विचार करावा लागणे हेच सर्वात महत्त्वाचे आहे. आजच्या काळात संत साहित्यातील ज्ञानाची गरज आहे.'' ह.भ.प. किसन महाराज साखरे म्हणाले, ''मेकॉलेने शिक्षणाची घालून दिलेली चौकट आजपर्यंत कोणीही तोडू शकले नाही. यामुळे देशातील व्यक्ती वैदिक तत्त्वज्ञानापासून दूर गेल्या आहेत.'' डॉ. संजय उपाध्ये म्हणाले, ''ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञान, भक्ती आणि श्रद्धा या सर्वांचा ऊहापोह करणाऱ्या संतसाहित्याचा उच्चशिक्षणात समावेश करणे काळाची गरज आहे. सध्याच्या शिक्षण पद्धतीमध्ये संत साहित्याचा अंर्तभाव दिसत नाही.'' प्रा. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन केले.

आज का आनंद
पुणे, शुक्रवार, दि.१६ जुलै २०२१

# संत साहित्य जीवन जीने की कला सिखाता है : जस्टिस विष्णु कोकजे

**एमआईटी डब्ल्यूपीयू में ऑनलाइन आयोजन में पूर्व राज्यपाल ने कहा**

कोथरूड, 15 जुलाई (आ.प्र.)

मातृभाषा में शिक्षा धीरे-धीरे बंद हो रही है. इसलिए हम संत साहित्य को भूलते जा रहे हैं. आज भौतिकतावादी शिक्षा प्रणाली अधिक प्रचलित है. इससे छात्रों में काफी तनाव और अवसाद है. ऐसे में यदि वे मूल्य आधारित जीवन जीने की कला सीखना चाहते हैं, तो उन्हें संत साहित्य का खजाना दिया जाना चाहिए. यह विचार विश्व हिंदू परिषद के अंतर्राष्ट्रीय अध्यक्ष और हिमाचल प्रदेश के पूर्व राज्यपाल जस्टिस विष्णु कोकजे ने व्यक्त किए.

पहली भारतीय संत साहित्य उच्च शिक्षा परिषद के उद्घाटन के समय वे बोल रहे थे. एमआईटी वर्ल्ड पीस यूनिवर्सिटी, पुणे और श्रीक्षेत्र आलंदी-देहू परिसर विकास समिति, आलंदी के संयुक्त तत्वावधान में इसका ऑनलाइन आयोजन किया गया था. परिषद की संयोजन समिति के अध्यक्ष हभप बापूसाहेब मोरे ने कहा, आज हर किसी को संतों के विचार जानने की जरूरत है. यदि शिक्षा के माध्यम से छात्रों को संतों के विचार प्राप्त हो, तो उनका जीवन बदल जाएगा. हभप किसन महाराज साखरे ने कहा, शिक्षा का मुख्य उद्देश्य मनुष्य को ज्ञान प्रदान करना है. ऐसे समय में जब एमआईटी ने शुरू से ही शिक्षा के क्षेत्र में प्रगति की है, ऐसे में संत साहित्य को शामिल करना जरूरी है. एमआईटी डब्ल्यूपीयू के संस्थापक-अध्यक्ष प्रो. डॉ. विश्वनाथ कराड ने कहा, यदि युवाओं में भारतीय संस्कृति, दर्शन और परंपरा का संदेश बोया जाए, तो एक सुसंस्कृत पीढ़ी का निर्माण होगा. साथ ही उच्च शिक्षा में संत साहित्य को शामिल करने से सामाजिक उत्थान होगा.

कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड ने कहा, छात्रों को यह सिखाया जाना चाहिए कि धर्म निरपेक्षता का वास्तव में क्या अर्थ है. आज पूरे विश्व में भारत की पहचान बढ़ाने के लिए शिक्षा में संत साहित्य की जरूरत है. हभप रविदास महाराज, डॉ. संजय उपाध्ये ने भी विचार रखे. सूत्र संचालन प्रो. गौतम बापट ने किया.

बातम्यांचा राजा
जनप्रवास
पुणे, शुक्रवार, दि.१६ जुलै २०२१

# संत साहित्य हे जीवन जगण्याची कला शिकविते

**पुणे**
**जनप्रवास प्रतिनिधी**

**माजी राज्यपाल न्या. विष्णू कोकजे यांचे विचार**

मातृभाषेतील शिक्षण हळु हळु बंद होत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये संत साहित्याची ओळखच नाही. आजच्या शिक्षण पद्धतीत भौतिकतेचा पगडा अधिक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात तणाव वाढून नैराश्य आले आहे. अशावेळेस मूल्याधिष्ठित जीवन जगण्याची कला शिकवायची असेल तर संत साहित्यांचा खजिना त्यांना द्यावा. असे विचार विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष व हिमाचल प्रदेशचे माजी राज्यपाल न्या.विष्णू कोकजे यांनी व्यक्त केले. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या चार दिवसीय 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदे'चे ऑनलाइन उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड हे अध्यक्षस्थानी होते. अध्यात्मिक गुरू ह.भ.प.किसन महाराज साखरे हे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते.

दैनिक नांदेड एकजूट

नांदेड, शुक्रवार, दि.१६ जुलै २०२१

# संत साहित्य हे जीवन जगण्याची...

अध्यात्मातून आत्मिक सुख मिळविता येते. आजच्या काळात डॉक्टर, इंजिनियर, वकील यांसारख्या अन्य क्षेत्रातील लोकांना शपथा घेऊन आपल्या कार्याशी एकनिष्ठ राहण्याची शपथ दिली जाते. पण शपथा घेऊन संस्कार कधीही येत नाहीत. त्यासाठी शिक्षणामध्ये संत साहित्यांचा समावेश करणे ही काळाची गरज आहे.

ह.भ.प.श्री. बापूसाहेब मोरे,शिक्षणामध्ये संत साहित्याचा समावेश व्हावा अशी कल्पना प्रथम डॉ. कराड यांनी मांडली. काळाची पाऊले ओळखून त्यांनी आज ही परिषद आयोजित करणे हे समाजाला दिशा दर्शक असेल. आज सर्वांना संतांचे विचार कळणे गरजेचे आहे. संत तुकाराम महाराजांनी संगतीवर खूप मोठ्या प्रमाणात लिखाण केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून संतांचे विचार मिळाले तर त्यांचे जीवन बदलेल.

ह.भ.प. श्री. किसन महाराज साखरे म्हणाले,एकीकडे मेकॉले ने शिक्षणाची घालून दिलेली चौकट आजपर्यंत कोणीही तोडू शकले नाही. यामुळे देशातील व्यक्ति हे वैदिक तत्वज्ञानापासून दूर गेले आहेत. शिक्षणाचा मुख्य उद्देश म्हणजे मानवला स्व: स्वरूपाचे ज्ञान करून देणे आहे. एमआयटीने सुरूवातीपासूनच शिक्षण क्षेत्रामध्ये प्रगती केली. अशा वेळेस संत साहित्याचा समावेश करणे ही महत्वपूर्ण बाब आहे.

प्रा.डॉ.विश्वनाथ दा. कराड म्हणाले,जगभर प्रसिद्ध असलेल्या वेदशास्त्रात ज्ञान आणि विज्ञानाचे सखोल ज्ञान समाविष्ठ आहे. आजची पिढी पाश्चात्य संस्कृतीमुळे वेगळ्या मार्गावर चाललेली आहे. त्यामुळे त्यांचे स्वत्व, स्वाभिमान आणि स्वधर्म गळून पडला आहे. त्याला जागृत करण्याचे कार्य संत साहित्यातून होईल. विज्ञान आणि अध्यात्माच्या समन्वयातून समाजात सुख, समाधान आणि शांती नांदेल. तरूणांमध्ये भारतीय संस्कृती, तत्वज्ञान आणि परंपरेचा संदेश रूजविल्यास संस्कारक्षम पिढी निर्माण होईल. तसेच, संत साहित्याचा उच्च शिक्षणामध्ये अंतर्भाव झाल्यास समाजोपयोगी होईल. त्याग, समर्पण, मानवता आणि संतांचे तत्वज्ञान विद्यार्थ्यांमध्ये रूजविणे ही काळाची गरज आहे. या जगाला ज्ञानेश्वर माऊली व जगद्गुरू संत तुकाराम महाराजांसारख्या संतांचा संदेशच तारू शकेल.

राहुल विश्वनाथ कराड म्हणाले,स्वातंत्र्यानंतर देशात जी प्रगती झाली ती खूप छान आहे. पण शिक्षण क्षेत्रात हवी तेवढी प्रगती झालेली नाही. त्यासाठी आपल्या शिक्षणात संत साहित्यांचा समावेश करून त्यावर संशोधन करणे गरजेचे आहे. यामुळे नवी पिढी ही देशाला नवी दिशा देऊ शकेल. वेस्टर्न जगात सर्व गोष्टी चांगल्या आहेत अशा मानसिकतेतून विद्यार्थ्यांना बाहेर काढणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना धर्म निरपेक्ष म्हणजे काय, धर्माचा खरा अर्थ समजावून सांगणे गरजेचे आहे. आज संपूर्ण जगात भारताची अस्मिता जागविण्यासाठी शिक्षणात संत साहित्याचा समावेश करणे गरजेचे आहे.

ह.भ.प. श्री. रविदास महाराज शिरसाठ म्हणाले, संत वाङ्मयामध्ये ज्ञान, विज्ञान, तत्वज्ञान, भक्ती, कर्तव्य, आरोग्य या सर्व गोष्टींचा अंतर्भाव आहे. म्हणून संत साहित्य हे शालेय व उच्च शिक्षणात समावेश करून विद्यार्थ्यांना अशा प्रकारचे संस्कार दिल्यास संस्कारक्षम पिढी निर्माण होईल. त्यातून समाजाचे कल्याण होईल.

डॉ. संजय उपाध्ये म्हणाले, ज्ञान, विज्ञान, तत्वज्ञान, भक्ती आणि श्रद्धा या सर्वांचा ऊहापोह करणारे संतसाहित्य उच्चशिक्षणात समावेश करणे काळाची गरज आहे. सध्याच्या शिक्षण पद्धतीमध्ये संत साहित्याचा अंर्तभाव दिसत नाही. एकीकडे पाहिले तर संत साहित्य काळाच्या कसोटीवर उतरलेले असून ते धार्मिक नाही तर पूर्णपणे वैज्ञानिक आहे. प्रा. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.

तरुण भारत
अकोला, शुक्रवार, दि.१६ जुलै २०२१

# संत साहित्य हे जीवन जगण्याची कला शिकविते

## न्या. विष्णू कोकजे यांचे विचार

### संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदेचे उद्‌घाटन

◆ **वाशीम, १५ जुलै**

मातृभाषेतील शिक्षण हळुहळु बंद होत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये संत साहित्याची ओळखच नाही. आजच्या शिक्षण पद्धतीत भौतिकतेचा पगडा अधिक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात तणाव वाढून नैराश्य आले आहे. अशावेळेस मूल्याधिष्ठित जीवन जगण्याची कला शिकवायची असेल तर संत साहित्यांचा खजिना त्यांना द्यावा. असे विचार विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष व हिमाचल प्रदेशचे माजी राज्यपाल न्या.विष्णू कोकजे यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या चार दिवसीय 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदे'चे आभासी उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ कराड हे अध्यक्षस्थानी होते. अध्यात्मिक गुरू किसन महाराज साखरे हे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी एमआयटीचे कार्याध्यक्ष व मुख्य निमंत्रक राहुल कराड, कुलगुरू डॉ. एन. टी. राव, सयोजन समितीचे अध्यक्ष बापूसाहेब मोरे, कार्याध्यक्ष डॉ. रविदास महाराज शिरसाठ, समन्वयक डॉ. संजय उपाध्ये आणि प्रा.डॉ. मिलिंद पांडे उपस्थित होते.



न्या. विष्णू कोकजे म्हणाले,उच्च शिक्षणावर विचार करावा लागणे हेच सर्वात महत्वाचे आहे. आजच्या काळात संत साहित्यांच्या ज्ञानाची खूप मोठी गरज आहे. चांगले नागरिक घडविणे आणि त्यांच्यात भारतीय संस्कार रुजविणे हे संत साहित्याचे कार्य आहे. संस्काराशिवाय शिक्षण देणे हे महाभयंकर कार्य आहे. विद्या विनयेन शोभते हे सुभाषित आहे. पण त्यात आध्यात्मिक ज्ञान असेल तर जीवन सुखमय होईल असे त्यांनी ठासून सांगितले.

संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी सोप्या भाषेत आध्यात्माची शिकवण दिली आहे. शिक्षणाबरोबरच आध्यात्मिक ज्ञान हे विद्यार्थी दशेत मनाला वेगळे वळण लावून त्यांना नव ऊर्जा देऊ शकते. अध्यात्मातून आत्मिक सुख मिळविता येते. आजच्या काळात डॉक्टर, इंजिनियर, वकील यांसारख्या अन्य क्षेत्रातील लोकांना शपथा घेऊन आपल्या कार्याशी एकनिष्ठ राहण्याची शपथ दिली जाते. पण शपथा घेऊन संस्कार कधीही येत नाहीत. त्यासाठी शिक्षणामध्ये संत साहित्यांचा समावेश करणे ही काळाची गरज आहे असे ते म्हणाले.

प्रा. डॉ. विश्वनाथ कराड म्हणाले, जगभर प्रसिद्ध असलेल्या वेदशास्त्रात ज्ञान आणि विज्ञानाचे सखोल ज्ञान समाविष्ट आहे. आजची पिढी पाश्चात्य संस्कृतीमुळे वेगळ्या मार्गावर चाललेली आहे. त्यामुळे त्यांचे स्वत्व, स्वाभिमान आणि स्वधर्म गळून पडला आहे. त्याला जागृत करण्याचे कार्य संत साहित्यातून होईल. विज्ञान आणि अध्यात्माच्या समन्वयातून समाजात सुख, समाधान आणि शांती नांदेल. तरूणांमध्ये भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान आणि परंपरेचा संदेश रूजविल्यास संस्कारक्षम पिढी निर्माण होईल. तसेच, संत साहित्याचा उच्च शिक्षणामध्ये अंतर्भाव झाल्यास समाजोन्नती होईल. त्याग, समर्पण, मानवता आणि संतांचे तत्त्वज्ञान विद्यार्थ्यांमध्ये रूजविणे ही काळाची गरज आहे. या जगाला ज्ञानेश्वर माऊली व जगद्‌गुरू संत तुकाराम महाराजांसारख्या संताचा संदेशच तारू शकेल.

राहुल विश्वनाथ कराड म्हणाले, स्वातंत्र्यानंतर देशात जी प्रगती झाली ती खूप छान आहे. पण शिक्षण क्षेत्रात हवी तेवढी प्रगती झालेली नाही. त्यासाठी आपल्या शिक्षणात संत साहित्यांचा समावेश करून त्यावर संशोधन करणे गरजेचे आहे. यामुळे नवी पिढी ही देशाला नवी दिशा देऊ शकेल. पाश्चिमात्य जगात सर्व गोष्टी चांगल्या आहेत अशा मानसिकतेतून विद्यार्थ्यांना बाहेर काढणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना धर्म निरपेक्ष म्हणजे काय, धर्माचा खरा अर्थ समजावून सांगणे गरजचे आहे. आज संपूर्ण जगात भारताची अस्मिता जागविण्यासाठी शिक्षणात संत साहित्याचा समावेश करणे गरजेचे आहे असेही ते म्हणाले.

डॉ. संजय उपाध्ये म्हणाले, ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञान, भक्ती आणि श्रद्धा या सर्वांचा ऊहापोह करणारे संतसाहित्य उच्चशिक्षणात समावेश करणे काळाची गरज आहे. सध्याच्या शिक्षण पद्धतीमध्ये संत साहित्याचा अंतर्भाव दिसत नाही. एकीकडे पाहिले तर संत साहित्य काळाच्या कसोटीवर उतरलेले असून ते धार्मिक तर आहेत शिवाय पूर्णपणे वैज्ञानिक आहे असे त्यांनी स्पष्ट केले. प्रा. गौतम बापट यांनी संचालन केले.◀ *(तभा वृत्तसेवा)*

**जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.**

पंढरी संचार

पंढरपूर, शुक्रवार, दि.१६ जुलै २०२१

# संत साहित्य हे जीवन जगण्याची कला शिकविते माजी राज्यपाल न्या.विष्णू कोकजे यांचे विचार

## एमआयटी डब्ल्यूपीयूत पहिल्या भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदेचे उद्घाटन

2021-07-15 06:15:06 IN PANDHARPUR IN SHARE ON WHATS APP



"मातृभाषेतील शिक्षण हळु हळु बंद होत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये संत साहित्याची ओळखच नाही. आजच्या शिक्षण पद्धतीत भौतिकतेचा पगडा अधिक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात तणाव वाढून नैराश्य आले आहे. अशावेळेस मूल्याधिष्ठित जीवन जगण्याची कला शिकवायची असेल तर संत साहित्यांचा खजिना त्यांना द्यावा." असे विचार विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष व हिमाचल प्रदेशाचे माजी राज्यपाल न्या.विष्णू कोकजे यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या चार दिवसीय 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदे'चे ऑनलाइन उदघाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड हे अध्यक्षस्थानी होते. अध्यात्मिक गुरू ह.भ.प.किसन महाराज साखरे हे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते.यावेळी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष व परिषदेचे मुख्य निमंत्रक राहुल विश्वनाथ कराड, कुलगुरू डॉ.एन.टी.राव, परिषदेच्या संयोजन समितीचे अध्यक्ष ह.भ.प. श्री. बापूसाहेब मोरे, कार्याध्यक्ष ह.भ.प. डॉ. रविदास महाराज शिरसाठ, समन्वयक डॉ. संजय उपाध्ये आणि प्रा.डॉ. मिलिंद पांडे हे उपस्थित होते.न्या.विष्णू कोकजे म्हणाले,"उच्च शिक्षणावर विचार करावा लागणे हेच सर्वात महत्वाचे आहे.  आजच्या काळात संत साहित्यांच्या ज्ञानाची खूप मोठी गरज आहे. चांगले नागरिक घडविणे आणि त्यांच्यात भारतीय संस्कार रुजविणे हे संत साहित्याचे कार्य आहे. संस्काराशिवाय शिक्षण देणे हे महाभयंकर कार्य आहे. विद्या विनयेन शोभते हे सुभाषित आहे. पण त्यात आध्यात्मिक ज्ञान असेल तर जीवन सुखमय होईल."

"संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी सोप्या भाषेत आध्यात्माची शिकवण दिली आहे. शिक्षणाबरोबरच आध्यात्मिक ज्ञान हे विद्यार्थी दशेत मनाला वेगळे वळण लावून त्यांना नव ऊर्जा देऊ शकते. आध्यात्मातून आत्मिक सुख मिळविता येते. आजच्या काळात डॉक्टर, इंजिनियर, वकील यांसारख्या अन्य क्षेत्रातील लोकांना शपथा घेऊन आपल्या कार्याशी एकनिष्ठ राहण्याची शपथ दिली जाते. पण शपथा घेऊन संस्कार कधीही येत नाहीत. त्यासाठी शिक्षणामध्ये संत साहित्यांचा समावेश करणे ही काळाची गरज आहे."

ह.भ.प.श्री. बापूसाहेब मोरे,"शिक्षणामध्ये संत साहित्याचा समावेश व्हावा अशी कल्पना प्रथम डॉ. कराड यांनी मांडली. काळाची पाऊले ओळखून त्यांनी आज ही परिषद आयोजित करणे हे समाजाला दिशा दर्शक असेल. आज सर्वांना संतांचे विचार कळणे गरजचे आहे. संत तुकाराम महाराजांनी संगतीवर खूप मोठ्या प्रमाणात लिखाण केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून संताचे विचार मिळाले तर त्यांचे जीवन बदलेल."

ह.भ.प. श्री. किसन महाराज साखरे म्हणाले,"एकीकडे मेकॉले ने शिक्षणाची घालून दिलेली चौकट आजपर्यंत कोणीही तोडू शकले नाही. यामुळे देशातील व्यक्ती हे वैदिक तत्वज्ञानापासून दूर गेलेे आहेत. शिक्षणाचा मुख्य उद्देश्य म्हणजे मानवला स्वः स्वरुपाचे ज्ञान करून देणे आहे. एमआयटीने सुरूवातीपासूनच शिक्षण क्षेत्रामध्ये प्रगती केली, अशा वेळेस संत साहित्याचा समावेश करणे ही महत्वपूर्ण बाब आहे."

प्रा.डॉ.विश्वनाथ दा. कराड म्हणाले,"जगभर प्रसिद्ध असलेल्या वेदशास्त्रात ज्ञान आणि विज्ञानाचे सखोल ज्ञान समाविष्ठ आहे. आजची पिढी पाश्चात्य संस्कृतीमुळे वेगळ्या मार्गावर चाललेली आहे. त्यामुळे त्यांचे स्वत्व, स्वाभिमान आणि स्वधर्म गळून पडला आहे. त्याला जागृत करण्याचे कार्य संत साहित्यातून होईल. विज्ञान आणि अध्यात्माच्या समन्वयातून समाजात सुख, समाधान आणि शांती नांदेल. तरूणांमध्ये भारतीय संस्कृती, तत्वज्ञान आणि परंपरेचा संदेश रूजविल्यास संस्कारक्षम पिढी निर्माण होईल. तसेच, संत साहित्याचा उच्च शिक्षणामध्ये अंतर्भाव झाल्यास समाजोन्नती होईल. त्याग, समर्पण, मानवता आणि संतांचे तत्वज्ञान विद्यार्थ्यांमध्ये रूजविणे ही काळाची गरज आहे. या जगाला ज्ञानेश्वर माऊली व जगद्गुरू संत तुकाराम महाराजांसारख्या संताचा संदेशच तारू शकेल."

राहुल विश्वनाथ कराड म्हणाले,"स्वातंत्र्यानंतर देशात जी प्रगती झाली ती खूप छान आहे. पण शिक्षण क्षेत्रात हवी तेवढी प्रगती झालेली नाही. त्यासाठी आपल्या शिक्षणात संत साहित्यांचा समावेश करून त्यावर संशोधन करणे गरजेचे आहे. यामुळे नवी पिढी ही देशाला नवी दिशा देऊ शकेल. वेस्टर्न जगात सर्व गोष्टी चांगल्या आहेत अशा मानसिकतेतून विद्यार्थ्यांना बाहेर काढणे गरजचे आहे. विद्यार्थ्यांना धर्म निरपेक्ष म्हणजे काय, धर्माचा खरा अर्थ समजावून सांगणे गरजचे आहे. आज संपूर्ण जगात भारताची अस्मिता जागविण्यासाठी शिक्षणात संत साहित्याचा समावेश करणे गरजेचे आहे."ह.भ.प. श्री. रविदास महाराज शिरसाठ म्हणाले," संत वाङ्मयामध्ये ज्ञान, विज्ञान, तत्वज्ञान, भक्ती, कर्तव्य, आरोग्य या सर्व गोष्टींचा अंतर्भाव आहे. म्हणून संत साहित्य हे शालेय व उच्च शिक्षणात समावेश करून विद्यार्थ्यांना अशा प्रकारचे संस्कार दिल्यास संस्कारक्षम पिढी निर्माण होईल. त्यातून समाजाचे कल्याण होईल."डॉ. संजय उपाध्ये म्हणाले, "ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञान, भक्ती आणि श्रद्धा या सर्वांचा ऊहापोह करणारे संतसाहित्य उच्चशिक्षणात समावेश करणे काळाची गरज आहे. सध्याच्या शिक्षण पद्धतीमध्ये संत साहित्याचा अंर्तभाव दिसत नाही. एकीकडे पाहिले तर संत साहित्य काळाच्या कसोटीवर उतरलेले असून ते धार्मिक नाही तर पूर्णपणे वैज्ञानिक आहे."प्रा. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन केले.

**जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.**